-१६३-

| | |
|---|---|
| आवक नंबर | ३६७१३-०३ |
| विभाग नोंदवही नंबर | |
| कार्य विवरण नंबर | |

**धार्मिक देवस्थानाच्या अनधिकृत बांधकामास आळा घालण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग(विशेष)**

परिपत्रक क्र.सीटीएम २०००/प्र.क्र.२४/विशा-१(ब)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक:- ६ ऑगस्ट, २००३.

वाचा:- १) महसुल व वन विभागाचे परिपत्रक क्र.एनएपी १०८५/१०५७८३/(९११)/ल-२, दि.१४.१०.२०००
२) या विभागाचे समक्रमांकाचे परिपत्रक दि.७ जून,२०००, दि.३१ जुलै,२००० व दि.४ जून,२००१.

## परिपत्रक

धार्मिक देवस्थान किंवा इतर धार्मिक प्रयोजनासाठी सरकारी जमीन देण्यापूर्वी किंवा बांधकामासंदर्भातील प्रस्तावाबाबत अवलंबण्याच्या विहित कार्यपध्दतीबाबत उपरोक्त शासन परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

२. अशा प्रकारच्या सूचना असतांना सुध्दा मंदिर/मशिद/चर्च/मदरसाच्या अनधिकृत बांधकामाबाबतच्या काही घटना निदर्शनास आल्या आहेत. बांधकामाबाबत शासनाच्या सूचना असूनही त्याचे काटेकोरपणे पालन केले जात नाही, ही गंभीर बाब आहे. या बाबींचा विचार करुन पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

अ) अशा प्रकारचे अनधिकृत बांधकाम चालू असल्यास ते तात्काळ तोडण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी कारवाई करणे आवश्यक आहे. अशा प्रकारची कारवाई करण्याबाबत निष्काळजीपणा किंवा विलंब केल्यास संबंधित अधिकाऱ्याला जबाबदार धरण्यात यावे.

ब) अशा प्रकारचे अनधिकृत बांधकाम यापुढे होणार नाही, याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे.

SEP 2003

३. या संदर्भात असेही स्पष्ट करण्यात येते की, यापुढे (फेब्रुवारी,२००३ नंतर) कोणत्याही प्रकारचे अनधिकृत मंदिर, मस्जिद, चर्च व धार्मिकस्थळांच्या बांधकामांना शासनाकडून संरक्षण देण्यात येणार नाही याची नोंद जिल्हाधिकारी व पोलीस अधिकाऱ्यांनी घ्यावी आणि अशाप्रकारची अनधिकृत बांधकामे चालू असतील किंवा तसे करण्याचा प्रयत्न

H-706(1000-8-03)



26 AUG 2003

कोणी करीत असेल, तर त्याच्याविरुध्द कडक कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहील. तसेच मान्यवर नेते, इतर धार्मिक संघटना किंवा इतर कोणतीही व्यक्ती यांच्याकडून अशाप्रकारचे अनधिकृत मंदिर/चर्च/मशिद व मदरसा बांधकामाबाबत हस्तक्षेप झाला तरी शासनाकडून त्याबाबत कोणत्याही प्रकारचे संरक्षण किंवा स्थगिती आदेश दिले जाणार नाहीत. संबंधित अधिकाऱ्यांनी यासंदर्भात त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकाऱ्यांना अशा अनधिकृत बांधकामाचे दैनंदिन निरीक्षण करण्याबाबत तसेच अशा प्रकारचे बांधकाम होत असल्यास त्याची तात्काळ दखल घेवून एम.आर. टी.पी.अधिनियमाखालील तरतूदीनुसार संबंधितांविरुध्द तात्काळ कारवाई करण्यात यावी.

४. सर्व जिल्हादंडाधिकारी/पोलीस अधीक्षक, पोलीस आयुक्त यांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, अशाप्रकारचे बांधकाम झाल्याचे व त्याबाबत संबंधितांकडून कारवाई झाली नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल.

५. धार्मिक देवस्थान बांधकामाच्या संदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन होईल, याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( वा. मं. तुरुकमाने )
अवर सचिव, गृह विभाग(विशेष), महाराष्ट्र शासन.